LAVASA

क‍ृपया प्रसिद्‍धीसाठी

# लवासातर्फे भारतात आपल्या प्रकारच्या पहिल्याच सेगवे ॲडव्हेंचर टूर्सचे आयोजन

- **सेगवे हा पर्यावरणस्नेही वाहतुकीचा एक पर्याय असून जगभरातील अनेक पर्यावरणस्थळांवर ही वाहने पर्यटकांना आकर्षित करून घेतात**
- **पायी चालत जाण्याचीच पण लांब अंतरे पार करण्यासाठी वाहतुकीचे सुरक्षित आणि कार्यक्षम साधन**

**लवासा, २५ जून, २०१४ :** भारतातील पहिले सुनियोजित पद्‍धतीने उभारलेले थंड हवेचे स्थळ असलेल्या लवासाने भारतात प्रथमच सेगवे ॲडव्हेंचर टूर्स सादर केल्या आहेत. लवासाला भेट देणाऱ्या पर्यटकांना आता या निसर्गरम्य थंड हवेच्या शहराची सफर पर्यावरणस्नेही, सुरक्षित आणि उत्साहवर्धक अशा सेगवे या वाहतुकीच्या पर्यावरणस्नेही साधनाच्या साह्याने करता येईल.

सेगवे ही जगभरात लोकप्रिय वाहतूकप्रणाली असून अनेक आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळांवर पर्यटकांना स्वतःच्या पद्‍धतीने विना अडथळा आणि थरारक पद्‍धतीने परिसर पाहण्यासाठी या स्वतःचा तोल राखणाऱ्या, बॅटरीचलित मिनी-बायसिकल्स उपलब्ध करून दिल्या जातात. लवासामध्येही आता पर्यटक मोठी अंतरे आरामात पार करत हिरवागार परिसर आणि रमणीय रस्ते न्याहाळू शकतात.

खास गायरोस्कोप तंत्र आणि उभे राहून चालवण्याचे तंत्र यामुळे सेगवे हे चालण्याची मोठी अंतरे पार करण्याचे अतिशय सुरक्षित आणि कार्यक्षम साधनांपैकी एक साधन बनले आहे. प्रौढ माणसाच्या शरीराच्या सरासरी आकारमानाएवढाच आकार आणि मानवी तोल सांभाळण्याचे कसब यामुळे सेगवे पीटी पादचाऱ्याइतकीच जागा व्यापते आणि जेथे जेथे माणूस चालत जाऊ शकतो, त्या सर्व ठिकाणी जाते.

सेगवे हा लवासा शहराची सफर करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे कारण तो पर्यावरणस्नेही शहराच्या तत्त्वज्ञानात बसणारा मार्ग आहे. त्याला कमीत कमी जागा लागते, हाताळायला अतिशय सोपे असणे आणि पदपथ आणि पायी चालत जाण्याच्या रस्त्यांवर सहजपणे चालण्याची क्षमता यामुळे हा पर्यटकांच्या पसंतीचा वाहतुकीचा पर्याय ठरतो. पर्यटक रस्त्यांवरून, लेकसाइड प्रोमेनाडवरून झपझप जाण्याचा तसेच छोट्या निसर्गयात्रांचा आनंद लुटू शकतात. या बॅटरीचलित वाहनांचा सर्वसाधारण रस्त्यांवरच नव्हे तर पर्वतांवर आणि साहसी सफरींवरही वापर करता येऊ शकतो. लवासा येथील ही सेवा भारतात प्रायोगिक साहसी पर्यटनाचा पाया घालणाऱ्या इकोमंत्रा नेचर ॲडव्हेंचरने देऊ केली आहे.

लवासा येथे भारतातील पहिल्या सेगवे ॲडव्हेंचर टूरचा शुभारंभ झाला, याबद्दल लवासा कॉर्पोरेशन लि.च्या टूरिझम हॉस्पिटॅलिटी ॲंड लिझर विभागाचे सिनीयर व्हाइस प्रेसिडेंट श्री. राजीव दुग्गल म्हणाले, ''लवासा शहरातील वेगवेगळ्या जागा धुंडाळण्याचे आणि शहराचे सौंदर्य निरखण्याचे वेगवेगळे मार्ग उपलब्ध करून देण्याचा आणि त्याद्वारे पर्यटकांचा सुटीचा अनुभव अधिक आनंददायी बनवण्याचा आमचा सततचा प्रयत्न असतो. सेगवेज हे एक शिकायला सोपे आणि मजेदार असे क्रांतिकारक नवे साधन आहे. शिवाय आम्ही सर्वसमावेशक सिटी टूर्समध्येच सेगवेवरून सफरीचा समावेश केलेला असल्यामुळे आता शहरातून फेरफटका केवळ मजेदार होणार नाही, तर मोठमोठी अंतरे पार करणेही आता आनंददायी होईल.

लवासा येथे तुम्ही आठवड्याचे सर्व दिवस सकाळी नऊ ते रात्री सहा या वेळात खुल्या असलेल्या टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटरशी या क्रमांकावर किंवा येथे ई मेल पत्त्यावर संपर्क साधून तुमच्या खास कार्यक्रमांनुसार सेगवे बुक करू शकता.

**लवासाविषयी**

लवासा हे भारतातील पहिले नियोजित थंड हवेचे ठिकाण आहे जिथे नागरिक निसर्गाच्या सानिध्यात राहून काम करू शकतात, शिकू शकतात आणि खेळू शकतात. लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे (एलसीएल) विकसित करण्यात आलेले हे एक खास शहर आहे. १०,००० हेक्टर्सवर वसलेले हे शहर आधुनिक शहरीकरणाच्या तत्वावर आधारलेले आहे. मुंबईहून तीन तासांच्या तर पुण्याहून तासाभराच्या रस्त्याच्या प्रवासाने लवासाला पोहोचता येते. भविष्यात पाहुणचार, पर्यटन, शिक्षण, आरोग्य, व्यावसायिक संशोधन आणि कारखाने यासारख्या क्षेत्रात लवासातर्फे जागतिक नेत्यांची एक फळीच उभारली जाणार आहे. या थंड हवेच्या ठिकाणी भाडेतत्वावरील घरे, अपार्टमेंट आणि व्हिलाजच्या स्वरूपात काही पारंपरिक आणि कालातीत वास्तुशात्राचे नमुने पाहायला मिळतात. अतिशय उच्च दर्जाच्या सोयीसुविधांमुळे हे शहर इथल्या नागरिकांना एक सुंदर आयुष्य जगण्याची संधी देते.

**अधिक माहितीसाठी कृपया यांच्याशी संपर्क साधा :**

ॲडफॅक्टर्स पीआर
श्री. परीक्षित जोशी ‒ ९८३३९१७०३०
parikshit.joshi@adfactorspr.com
श्री. निनाद सिद्धये ‒ ९६१९५००७६०
ninad.siddhaye@adfactorspr.com

लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड
श्री. अश्विन शेट्टी- ९९६७०२४२९३
ashwin.shetty@lavasa.com
श्री. अंकुल भावसार - ९८२०१६८८४२
ankul.bhavsar@lavasa.com